# जिल्हा समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद वाशिम या कार्यालयाकडून राबविण्यात येणाऱ्या शिष्यवृत्ती योजनांतर्गत प्रस्तावासोबत जोडावयाच्या आवश्यक कागदपत्रांची यादी

| अ.क्र | योजनेचे नाव | आवश्यक कागदपत्रे | दर | शासन निर्णय | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| ३ | सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजना इ. ५ वी ते ७ वी आणि मुलींसाठी (अनु.जाती) | १) विहित प्रपत्रात ३ प्रतित प्रपत्र मुख्याध्यापक व गटशिक्षणाधिकारी यांचे स्वाक्षरीस्तव<br>२) शिष्यवृत्तीचा लाभ मिळणेकरीता विद्यार्थ्यांचे स्व:ताचे बँक खाते आधारसंलग्नित असणे आवश्यक आहे.<br>३) शिष्यवृत्तीचा लाभ मिळणेकरीता विद्यार्थ्यांचे स्वताचे बँक खाते आधारसंलग्नित असणे आवश्यक आहे. | दर प्रति महा रु. ६०X१०= ६००/- | सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्र.:- इपीसी-२००३/प्र.क्र४१७/मावक-२ मुबई दिनांक:- ३१ मार्च २००५ | महाडिबीटी प्रणाली वेब लिंक https://prematric.mahait.org/Login/Login सन २०२३-२४ पासून ऑनलाईन शिष्यवृत्ती योजना |
| | सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजना इ. ८ वी ते १० वी मध्ये शिकणाऱ्या मुलींसाठी (अनु.जाती) | | दर प्रति महा रु. रु. १००X१०=१०००/- | सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, क्रीडाव विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्रं. इबीसी-२००३/प्र.क्र.११६/मावक-२ मुंबई दिनांक:- २३ मे, २००३ | |

जिल्हा समाजकल्याण अधिकारी
जिल्हा परिषद वाशिम

Scanned with OKEN Scanner

# जिल्हा समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद वाशिम या कार्यालयाकडून राबविण्यात येणाऱ्या शिष्यवृत्ती योजनांतर्गत प्रस्तावासोबत जोडावयाच्या आवश्यक कागदपत्रांची यादी

| अ.क्र | योजनेचे नाव | आवश्यक कागदपत्रे | दर | शासन निर्णय | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| ४ | माध्यमिक शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना गुणवत्ता शिष्यवृत्ती (अनु.जाती) | १) विहित प्रपत्रात ३ प्रतित प्रपत्र मुख्याध्यापक व गटशिक्षणाधिकारी यांचे स्वाक्षरीसह<br>२) विद्यार्थी मागील वर्षी उत्तीर्ण झाल्याची मुख्याध्यापकांनी साक्षांकित केलेली गुणपत्रीका.<br>३) विद्यार्थिनीचे स्वता:चे बँक आधारसंलग्नित असावे व आधार कार्ड ची छायांकित प्रत सोबत जोडावी. | इ.५ वी ते ७ वी दर प्रति महा रु ५०X१०=५००/-<br>इ. ८वी ते १० दर प्रति महा रु. १००X१०= १०००/- | सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,<br>शासन निर्णय क्र. - इबीसी २००३/प्र.क्र.४६६/मावक-२ मुंबई दिनांक :- ९ फेब्रुवारी २००७ | महाडिबीटी प्रणाली वेब लिंक https://prematric.mahait.org/Login/Login<br>सन २०२३-२४ पासून ऑनलाईन शिष्यवृत्ती योजना |

जिल्हा समाजकल्याण अधिकारी
जिल्हा परिषद,वाशिम

Scanned with OKEN Scanner

# जिल्हा समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद वाशिम या कार्यालयाकडून राबविण्यात येणाऱ्या शिष्यवृत्ती योजनांतर्गत प्रस्तावासोबत जोडावयाच्या आवश्यक कागदपत्रांची यादी

| अ.क्र | योजनेचे नाव | आवश्यक कागदपत्रे | दर | शासन निर्णय | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| ५ | महर्षि विठ्ठल रामजी शिंदे शिक्षण शुल्क परिक्षा शुल्क | १) विहीत प्रपत्रात ३ प्रतीत प्रपत्र मुख्याध्यापक व गटशिक्षणाधिकारी यांचे स्वाक्षरीसह.<br>२) विद्यार्थी मागील वर्षी उत्तीर्ण झाल्याची मुख्याध्यापकांनी साक्षांकित केलेली गुणपत्रीका<br>३) विद्यार्थीनीचे स्वता:चे बँक बँक आधारसंलग्नित असावे व आधार कार्ड छायांकित प्रत सोबत जोडावी. | रु. ४७०/- | सचिव शिक्षण राज्य मंडळ पुणे यांचे पत्र क्र. १७८८ दिनांक :- ३० एप्रिल २०२४ अन्वये | महाडिबीटी प्रणाली वेब लिंक https://prematric.mahait.org/Login/Login सन २०२३-२४ पासून ऑनलाईन शिष्यवृत्ती योजना |

जिल्हा समाजकल्याण अधिकारी,
जिल्हा परिषद,वाशिम

Scanned with OKEN Scanner

# समाज कल्याण विभाग,जिल्हा परिषद,वाशिम

<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>योजनेचे नांव</th><th>योजनेचे स्वरुप</th><th>अनुदान</th><th>शासन निर्णय</th></tr>
<tr>
<td>१</td>
<td>अनुसूचित जाती व नवबौध्द घटकाच्या वस्तीचा विकास करणे योजना</td>
<td>अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्तीचा विकास करणे या योजनेचा एक भाग म्हणुन राज्यातील ग्रामीन भागातील अनुसूचित जाती व नवबौध्द वस्त्यातील अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या मुलभूत गरजा भागविण्यासाठी सदर जिल्हास्तरीय योजना सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत सन १९७४ पासुन राबविण्यात येत आहे व ही योजना जिल्हा परिषदेमार्फत अंमलात आणली जाते.अनुसूचित जाती उपयोजना अंतर्गत जिल्हा स्तरीय योजनांसाठी प्रत्येक जिल्हयाला जी नियमव्ययाची मर्यादा दिली जाते त्यामध्ये प्रत्येक जिलहयाच्या जिल्हा नियोजन व विकास समितीमार्फत (DPDC) या योजनेसाठी तरतुद केली जाते.<br><br>सदर योजनेअंतर्गत समाविष्ठ कामे<br>१.पाणी पुरवठयाची कामे २.मलनि:स्सारण ३.वीज ४.गटार बांधने,५.अंतर्गत रस्ते ५.पोच रस्ते ६.पर्जन्य पाण्याचा निचरा ७.समाज मंदिर ८.समाज मंदिर दुरुस्ती ( पाच वर्षातुन एकदा) सामाजिक न्याय व विशेष सहाय विभाग शासन निर्णय दिनांक ६.१०.२०२१ नुसार अनुसूचित जातीच्या वस्तीला लोकसंख्येच्या प्रमाणात खालीलप्रमाणे निधी देय आहे.<br><br>आवश्यक कामाचा प्रस्ताव ग्रामपंचायतने गटविकास अधिकरी पंचायत समिती यांचेमार्फत समाज कल्याण विभाग,जिल्हा परिषद,वाशिम येथे सादर करणे आवश्यक आहे.</td>
<td>सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग शासन निर्णय दिनांक ६.१०.२०२१ नुसार अनुसूचित जातीच्या वस्तीला लोकसंख्येनुसार खालीलप्रमाणे अनुदान देय आहे.<br><br>
<table>
<tr><th>अ.क्रं.</th><th>अनुसूचित जातीची लोकसंख्या</th><th>अनुदान रक्कम (रु.लाखात)</th></tr>
<tr><td>१</td><td>१० ते २५</td><td>४.००</td></tr>
<tr><td>२</td><td>२६ ते ५०</td><td>१०.००</td></tr>
<tr><td>३</td><td>५१ ते १००</td><td>१६.००</td></tr>
<tr><td>५</td><td>१०१ ते १५०</td><td>२४.००</td></tr>
<tr><td>६</td><td>१५१ ते ३००</td><td>३०.००</td></tr>
<tr><td>७</td><td>३०१ च्या पुढे</td><td>४०.००</td></tr>
</table>
</td>
<td>१. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग शासन निर्णय दिनांक ५.१२.२०११<br>२. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग शासन निर्णय दिनांक ६.१०.२०२१</td>
</tr>
</table>

जिल्हा समाजकल्याण अधिकारी
जिल्हा परिषद,वाशिम

Scanned with OKEN Scanner

# समाज कल्याण विभाग,जिल्हा परिषद,वाशिम

| योजनेचे नांव | योजनेचे स्वरुप | अनुदान | शासन निर्णय |
|---|---|---|---|
| स्वयंसेवी संस्थांमार्फत चालविण्यात येणा-या मागासवर्गीय अनुदानित वसतिगृहांना सहायक अनुदान | मागासवर्गीय विद्यार्थ्यांना त्यांचा शिक्षणक्रम पूर्ण करता यावा,ग्रामीण भागामध्ये मागासवर्गीय विद्यार्थ्यांमधील शाळा गळतीचे प्रमाण कमी व्हावे,आर्थिक दुरावस्थेमुळे मागासवगीय पालकांना त्यांच्या मुलांच्या शिक्षणात अडचणी येऊ नयेत आणि मागासर्गीय विद्यार्थ्यांचा शैक्षणिक विकास व्हावा या उददेशाने ही योजना सन १९५०-५१ पासुन कार्यान्वीत केलेली आहे.<br><br>अनुदानित वसतिगृहात प्रवेशाकरीता संबंधित अनुदानित वसतिगृहाचे अधिक्षक यांचेशी संपर्क करावा. | **कर्मचारी वेतन**-वसतिगृह अधिक्षक,स्वयंपाकी,मदतनिस व चौकीदार यांना मासिक मानधन देण्यात येते.<br>**परिपोषण अनुदान**-प्रति विद्यार्थी प्रति माह रु २१००/- प्रमाणे दहा महीण्याकरीता शासनाकडुन निवासी विद्यार्थ्यांसाठी परिपोषण अनुदान देण्यात येते<br>**इमारत भाडे**-इमारत भाडयपोटी सार्वजनिक बांधकाम विभागाने प्रमाणित केलेल्या भाडयाच्या ७५ टक्के भाडे संस्थेस देण्यात येते.<br>**सोयी सुविधा**-निवास,भोजन,आंथरुन,पांघरुन,क्रिडा साहीत्य इ.सोयी सुविधा मोफत देण्यात येतात. | १. शासन निर्णय बीसीएच१०९०/प्र.क्र.१०३/मावक-८/मंत्रालय विस्तार भवन मुंबई ३२, दि.१६/०३/१९९८ |

जिल्हा समाजकल्याण अधिकारी
जिल्हा परिषद,

# दिव्यांग व्यक्तींसाठी साधने आणि उपकरणांसाठी आर्थिक सहाय्य

## दिव्यांग व्यक्तींसाठी साधने आणि उपकरणांसाठी आर्थिक सहाय्य निधी

राज्य शासन

### योजनेचे उद्दिष्ट

दिव्यांग व्यक्तींना, त्यांचा वयोगट आणि दिव्यांगत्वाप्रमाणे, साधने आणि उपकरणे खरेदी करण्यासाठी सहाय्य

### प्रवर्ग

**दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ प्रमाणे, २१ अपंगत्व प्रवर्गामधील दिव्यांग व्यक्ती**

### पात्रता निकष

1. अर्जदार किमान ४०% दिव्यांगत्व असले पाहिजे
2. अर्जदार महाराष्ट्राचा रहिवासी असला पाहिजे
3. अर्जदाराचे मासिक उत्पन्न खालीलप्रमाणे असल्यास –
   अ. रु.१५००/- पेक्षा कमी : साधने आणि उपकरणांच्या किमतीच्या १००%
   ब. रु.१५००/-ते २०००/- : साधने आणि उपकरणांच्या किमतीच्या ५०%

### मिळणारे लाभ

कर्णबधीर व्यक्तींसाठी श्रवणयंत्र, अस्थिव्यं व्यक्तींसाठी कुबड्या, तिचाकी, कॅलिपर्स , चाकाची खुर्ची, अंध व्यक्तींसाठी शैक्षणिक वापराकर्ता फीत ध्वनिमुद्रकआणि कोरी ध्वनीफीत (रु. ३०००/- पर्यन्त).

### अर्ज करण्याची प्रक्रिया

अर्जदाराने विहित नमून्यातील अर्ज भरुन संबंधित जिल्हा समाज कल्याण कार्यालय, जिल्हा परिषद /सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण विभाग, मुंबई शहर व मुंबई उपनगर यांच्याकडे दाखल करणे. विहित नमुन्यामध्ये, आवश्यक कागदपत्रासहित, अर्ज दाखल करावा.

### योजनेचा प्रकार

विशेष सहाय्य

### संपर्क कार्यालय

जिल्हा समाज कल्याण कार्यालय, जिल्हा परि/ सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण विभाग, मुंबई शहर व उपनगर

### लाभार्थी:

दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ प्रमाणे, २१ अपंगत्व प्रवर्गामधील दिव्यांग व्यक्ती

जिल्हा समाजकल्याण अधिकारी
जिल्हा परिषद,वाशिम

# दिव्यांग व्यक्तींना स्वयंरोजगारासाठी आर्थिक सहाय्य निधी

राज्य शासन

## योजनेचे उद्दिष्ट

या योजनेचा मुख्य उद्देश सध्या बेरोजगार असणाऱ्या दिव्यांग व्यक्तींना स्वयंरोजगाराकरीता आर्थिक सहाय्य देणे. या योजनेअंतर्गत, दिव्यांग व्यक्तींना, स्वयंरोजगार, लघु उद्योग आणि/किंवा कृषि आधारित व्यवसाय करण्यास प्रोत्साहित करण्यासाठी आर्थिक सहाय्य दिले जाते.

## प्रवर्ग

दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ प्रमाणे, २१ अपंगत्व प्रवर्गामधील दिव्यांग व्यक्ती

## पात्रता निकष

- अर्जदार किमान ४०% दिव्यांगत्व असले पाहिजे
- अर्जदार महाराष्ट्राचा रहिवासी असला पाहिजे
- अर्जदाराचे १८ ते ५० वर्षांमध्ये असावे
- अर्जदाराचे वार्षिक उत्पन्न रु.१०००००/- पेक्षा कमी असावे.

## मिळणारे लाभ

या योजनेअंतर्गत, रु.१५००००/- यामधील आर्थिक सहाय्य दिले जाते. ८०% कर्जाची रक्कम राष्ट्रीयीकृत बँकेकडून पुरवली जाते आणि २०% किंवा रु.३००००/- पर्यन्तचे अनुदान, समाज कल्याण विभागातर्फे स्वयंरोजगारासाठी दिले जाते.

## अर्ज करण्याची प्रक्रिया

अर्जदाराने विहीत नमून्यात अर्ज भरुन संबंधित जिल्हा समाज कल्याण कार्यालय, जिल्हा परिषद/सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण विभाग, मुंबई शहर व उपनगर यांच्याकडे दाखल करणे. विहित नमुन्यामध्ये, आवश्यक कागदपत्रासहित, अर्ज दाखल करावा.

## योजनेचा प्रकार

स्वयंरोजगार

## संपर्क कार्यालय

जिल्हा समाज कल्याण कार्यालय, जिल्हा परिषद /सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण विभाग, मुंबई शहर व उपनगर

## लाभार्थी:

दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ प्रमाणे, २१ अपंगत्व प्रवर्गामधील दिव्यांग व्यक्ती

जिल्हा समाजकल्याण अधिकारी
जिल्हा परिषद,वाशिम

Scanned with OKEN Scanner

# अपंग अव्यंग विवाहविषयक प्रोत्साहन अनुदान

## विवाहविषयक प्रोत्साहन निधी

राज्य शासन

### योजनेचे उद्दिष्ट

एक दिव्यांग व्यक्ती, किमान ४०% अपंगत्व असलेली, दिव्यांग नसलेल्या व्यक्तीशी विवाह करत असेल. अशी दिव्यांग व्यक्ती विवाहविषयक प्रोत्साहनास पात्र असेल.

### प्रवर्ग

दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ प्रमाणे, २१ अपंगत्व प्रवर्गामधील दिव्यांग व्यक्ती

### पात्रता निकष

1. विवाह करणाऱ्या दोघांपैकी किमान एक – पत्नी किंवा पति दिव्यांग असावी
2. अर्जदार किमान ४०% दिव्यांग असावा
3. अर्जदार महाराष्ट्राचा रहिवासी असावा

### मिळणारे लाभ

पात्र जोडप्याला रु ५००००/- आर्थिक सहाय्य मिळेल.

त्याचे स्वरूप खालीलप्रमाणे आहे

1. रु २५,०००/- चे बचत प्रमाणपत्र
2. रु २०,०००/- रोख रक्कम
3. रु ४,५००/- गृहोपयोगी वस्तूंच्या स्वरूपात
4. रु ५००/- विवाहविषयक प्रोत्साहनाच्या कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी

### अर्ज करण्याची प्रक्रिया

अर्जदाराने विहित नमुन्यात अर्ज भरून संबंधित जिल्हा समाज कल्याण कार्यालय, जिल्हा परिषद यांच्याकडे दाखल करणे. विहित नमुन्यामध्ये आवश्यक कागदपत्रासहित अर्ज दाखल करावा.

### योजनेचा प्रकार

सामाजिक प्रोत्साहन

### संपर्क कार्यालय

जिल्हा समाज कल्याण कार्यालय, जिल्हा परिषद

### लाभार्थी:

दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ प्रमाणे, २१ अपंगत्व प्रवर्गामधील दिव्यांग व्यक्ती

जिल्हा समाजकल्याण अधिकारी
जिल्हा परिषद, वाशिम

Scanned with OKEN Scanner

# दिव्यांग व्यक्तींसाठी राज्य शालांत परीक्षा-पूर्व शिष्यवृत्ती

राज्य शासन

## योजनेचे उद्दिष्ट

दिव्यांग मुलांच्या शिक्षणास प्रोत्साहन देणे.

## प्रवर्ग

दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ प्रमाणे, २१ अपंगत्व प्रवर्गामधील दिव्यांग व्यक्ती

## पात्रता निकष

1. अर्जदार किमान ४०% दिव्यांग असावा
2. अर्जदार महाराष्ट्राचा रहिवासी असावा
3. इयत्ता पहिलीपासून ते दहावी पर्यन्त शिकत असले पाहिजे आणि शिक्षणाच्या मागील वर्षात अनुत्तीर्ण राहिलेले नसावा
4. उत्पन्नाची मर्यादा नाही

## मिळणारे लाभ

1. इयत्ता पहिली ते चौथी (कर्णबधीर असणाऱ्यांसाठी पूर्व प्राथमिक शिक्षणासाठी)
   प्रत्येक विद्यार्थ्याकरता दरमहा रु.१००/-
2. इयत्ता पाचवी ते सातवी
   प्रत्येक विद्यार्थ्याकरता दरमहा रु.१५०/-
3. इयत्ता आठवी ते दहावी
   प्रत्येक विद्यार्थ्याकरता दरमहा रु.२००/-
4. १८ वर्षे वयापर्यन्तच्या, मानसिक दुर्बलता आणि मानसिक आजाराने ग्रासलेल्या व्यक्ती
   प्रत्येक विद्यार्थ्याकरता दरमहा रु.१५०/-
5. कार्यशाळेतील दिव्यांग प्रशिक्षणार्थी
   प्रत्येक विद्यार्थ्याकरता दरमहा रु.३००/-

## अर्ज करण्याची प्रक्रिया

अर्जदाराने विहित नमून्यामध्ये अर्ज भरुन आवश्यक कागदपत्रासहित संबंधित शाळेमार्फत अर्ज दाखल करावा.

## योजनेचा प्रकार

शिक्षण

## संपर्क कार्यालय

जिल्हा समाज कल्याण कार्यालय, जिल्हा परिषद

## लाभार्थी:

दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ प्रमाणे, २१ अपंगत्व प्रवर्गामधील दिव्यांग व्यक्ती

**फायदे:**

वर नमूद केल्याप्रमाणे

**अर्ज कसा करावा**

वर नमूद केल्याप्रमाणे

जिल्हा समाजकल्याण अधिकारी
जिल्हा परिषद, वाशिम

Scanned with OKEN Scanner